सकाळ



कोल्हापूर : शाश्वत प्रतिष्ठानतर्फे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिवाजी मोरे, डॉ. गुरुदत्त म्हाडगुत, अविनाश टकळे, निखिल जाधव, मिलिंद सुरूलकर, प्रसाद देसाई, सचिन गायकवाड आदी उपस्थित होते.

# शाश्वत प्रतिष्ठानतर्फे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा सत्कार

कोल्हापूर : शाश्वत प्रतिष्ठानतर्फे शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाला जागतिक पातळीवरील संशोधनाच्या माध्यमातून स्थान मिळवून दिल्याबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा सत्कार प्रतिष्ठानचे संचालक शिवाजी मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रा. डॉ. विलास शिंदे यांची कुलसचिवपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गुरुदत्त म्हाडगुत, संचालक अविनाश टकळे, निखिल जाधव, मिलिंद सुरूलकर, प्रसाद देसाई, सचिन गायकवाड आदी उपस्थित होते.

- 6 SEP 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषद

## डॉ. विनय सहस्रबुद्धे, फुकाहोरी यासुकाता यांची उपस्थिती

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठात गुरुवार (ता. ७) ते शनिवार (ता. ९) दरम्यान १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषद होणार आहे.

भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे, मुंबईतील जपानचे कॉन्सुलेट जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता यांच्यासह कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (ता. ८) सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात या परिषदेचे उद्‌घाटन होईल, अशी माहिती विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कक्षाचे प्रमुख डॉ. एस. बी. सादळे यांनी दिली. या उद्‌घाटन समारंभास भारताचे जपानमधील राजदूत सिबी जॉर्ज, आयसीटी मुंबईचे इमॅरिटस प्राध्यापक डॉ. जी. डी. यादव, जपान सोसायटी फॉर दि प्रमोशन ऑफ सायन्स (जेएसपीएस) या संस्थेचे अध्यक्ष सुजीनो सुयोशी आणि इंडियन जेएसपीएस अल्युम्नाय असोसिएशनचे (आयजेएए) अध्यक्ष प्रा. डी. शक्ती कुमार उपस्थित राहणार आहेत.



डॉ. विनय सहस्रबुद्धे



डॉ. फुकाहोरी यासुकाता

उद्‌घाटनानंतर डॉ. यादव यांचे 'दि नेट झीरो गोल अँड सस्टेनॅबिलिटी' या विषयावर बीजभाषण होईल. यावेळी जपान सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी एजन्सी (जेएसटी) यांच्याकडून प्रात्यक्षिके सादर केली जातील. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम होतील. प्रा. यामादा, साकाई, मुरुकेशन माथम, युजी मियाटो, डॉ. श्याम नंदी, सुदीप्ता बर्मन, प्रा. स्मिता पवार, इरी इकेडा, डॉ. रुपेश देशमुख आदींची व्याख्याने शनिवारी होतील.

टोक्यो युनिव्हर्सिटी, जपान आणि जेएसपीएस बिझनेस, जपान यांच्या वतीने सादरीकरणे होतील. सायंकाळी सव्वाचार वाजता समारोप समारंभ होईल.

### विद्यार्थी, सर्वसामान्य नागरिकांसाठीही विशेष व्याख्याने

■ संशोधकांव्यतिरिक्त विज्ञान व तंत्रज्ञानाचा परिघ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत विस्तारण्यासाठी या आंतरराष्ट्रीय परिषदेंतर्गत विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठीही विशेष व्याख्यानांचे आयोजन केले आहे. परिषदेच्या पूर्वसंध्येला गुरुवारी सायंकाळी ५ वाजता प्रा. योशिरो अझुमा यांचे 'जपानमधील वैज्ञानिक संशोधनाची संस्कृती व शिक्षण : आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन व समकालीन समस्या' या विषयावर वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात खुले व्याख्यान होईल. शनिवारी सकाळी ११ वाजता शालेय विद्यार्थ्यांसाठी 'ईग्नायटिंग माईंड्स ऑफ स्कूल चिल्ड्रेन' या विषयावर वनस्पतीशास्त्र विभागाच्या नीलांबरी सभागृहात विशेष कार्यक्रम आयोजित केला असल्याचे डॉ. सादळे यांनी सांगितले.

लोकमत

# विद्यापीठात उद्यापासून विज्ञान-तंत्रज्ञान परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात उद्या गुरुवारी ७ ते ९ सप्टेंबर या कालावधीत १३व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान- तंत्रज्ञान परिषदेचे आयोजन केले आहे.

भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे, मुंबईतील जपानचे कॉन्सुलेट जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता यांच्यासह कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ८ सप्टेंबरला सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात परिषदेचे उद्घाटन होईल, अशी माहिती विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कक्षाचे प्रमुख डॉ. एस. बी. सादळे यांनी दिली.

परिषदेत विज्ञान व तंत्रज्ञानविषयक चर्चासत्रांसह सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन केले आहे. ८ सप्टेंबरला होणाऱ्या उद्घाटन समारंभास भारताचे जपानमधील राजदूत सिबी जॉर्ज, आयसीटी मुंबईचे इमॅरिटस प्राध्यापक डॉ. जी. डी. यादव, जपान सोसायटी फॉर दि प्रमोशन ऑफ सायन्स (जेएसपीएस) या संस्थेचे अध्यक्ष सुजीनो सुयोशी, प्रा. डी. शक्ती कुमार उपस्थित राहतील.

- 6 SEP 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कृषी'तील संधींसाठी कौशल्य विकास करा

## अमोल बिरारी : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेला प्रतिसाद

**सकाळ वृत्तसेवा**



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग, समाजशास्त्र अधिविभाग आणि 'एसआयआयएलसी'तर्फे पदवीधरांसाठी 'कृषी व्यवसाय व अन्न प्रक्रिया उद्योग संधी' याविषयावर कार्यशाळा घेण्यात आली. त्याला पदवीधर, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कोल्हापूर, ता. ५ : 'शेती क्षेत्रात पदवीधरांना उद्योजक होण्यासह रोजगाराच्या अफाट संधी आहेत. ग्रामीण भागात शेतीवर आधारित प्रक्रिया उद्योग व त्यातून अनेकांना रोजगार उपलब्ध करून देणे शक्य आहे. तरुणांनी याचा विचार करावा. कृषी व्यवसाय संबंधित माहिती घेऊन आवश्यक ती कौशल्ये स्वतःमध्ये विकसित करावीत,' असे प्रतिपादन 'सकाळ'-'ॲग्रोवन' संलग्न शैक्षणिक संस्था 'एसआयआयएलसी'चे कृषी विभागप्रमुख अमोल बिरारी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग, समाजशास्त्र अधिविभाग आणि 'एसआयआयएलसी'तर्फे पदवीधरांसाठी 'कृषी व्यवसाय व अन्न प्रक्रिया उद्योग संधी' याविषयावर विद्यापीठात कार्यशाळा झाली. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. अन्न प्रक्रिया उद्योजिका गंधाली दिंडे, मसाला प्रक्रिया उद्योजक तुषार राऊत, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, बेटी बचाव अभियान समन्वयक डॉ. पी. बी. देसाई, वरिष्ठ व्यवस्थापक अमित मांजरे उपस्थित होते.

SIILC
Transforming Human Capital

उद्योजिका दिंडे म्हणाल्या, "अन्न प्रक्रिया उद्योग छोट्या स्तरावर सुरू करून त्यात मोठी उलाढाल करणे शक्य आहे. यासाठी तरुणांनी व्यवसायाची माहिती घेऊन. शासनाच्या मदतीद्वारे स्टार्ट-अप सुरू करण्यास संधी आहे."

या कार्यशाळेत डॉ. प्रकाश राऊत यांनी विद्यापीठातील इनक्युबेशन सेंटरची माहिती दिली. ज्या विद्यार्थ्यांना नव उद्योजक व्हायचे आहे, त्यांच्यासाठी सेंटरतर्फे सीड फंडिंग उपलब्ध करून दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी विद्यापीठातील तसेच संलग्न महाविद्यालये, कृषी महाविद्यालयांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. बिझनेस डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह स्वप्नील साखरे, कार्यक्रम समन्वयक स्वप्नील मानगावे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी योगदान दिले.

### व्यवसाय करण्यासाठी जिद्द ठेवा

कोल्हापुरातील 'तुषार मसाले'चे संस्थापक तुषार राऊत यांनी त्यांच्या उद्योगाच्या वाटचालीची यशोगाथा सांगितली. ते म्हणाले, 'कोणताही व्यवसाय सुरू करण्यासाठी जिद्द ठेवावी. आपले उत्पादन चांगले आहे, ते अधिकाधिक लोकांना पटवून द्यावे.'

### झोकून देऊन काम करा

विद्यार्थ्यांनी कोणत्याही कामात यशस्वी होण्यासाठी झोकून देत कामाची तयारी, जिद्द, चिकाटी, तसेच सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे महत्त्वाचे आहे. विद्यापीठ विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित करण्यासाठी नेहमीच तत्पर असून, विविध प्रशिक्षण देण्यावर भर दिला असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सांगितले.



भोवताल

# पावसाळ्यातील दुष्काळ!

डॉ. व्ही.एन. शिंदे

या वर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वीपासून वेगळेच संकेत मिळत होते. हवामान खात्याच्या अहवालानुसार, सरासरीच्या ९८ ते १०० टक्के पाऊस अपेक्षित होता. केरळमध्ये मान्सून वेळेवर आलाही. तेथून गोव्यापर्यंत मान्सूनचा प्रवास सुरळीत झाला. महाराष्ट्रात पाऊस प्रवेश करणार तेवढ्यात अरबी समुद्रात चक्रीवादळ आले. मान्सूनच्या मार्गात अडथळा निर्माण झाला. महाराष्ट्रात चिंतेचे वातावरण पसरले. अखेर जुलैच्या अखेरीस तो पुढे सरकला आणि पाऊस पडू लागला. पाऊस जोरात पडू लागला. एक क्षण असा आला की, पश्चिम महाराष्ट्रात पूरपरिस्थिती उद्भवते की काय, असे वाटू लागले. मात्र, लगेचच पाऊस थांबला आणि पुराचे संकट टळले. मात्र, पुढे सरकलेला मान्सून उत्तर भारतात पोहोचला आणि त्याने उग्र रूप धारण केले.

महाराष्ट्राला पुराच्या तणावातून मुक्त करून पुढे सरकलेला मान्सून उत्तर भारतात मात्र धुव्वांधार बरसला. हरयाणा, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि राजस्थान या राज्यांत अतिवृष्टी झाली. हिमाचल प्रदेशाला पावसाचा फटका सर्वाधिक बसला. पावसामुळे ३३० पेक्षा जास्त बळी गेले. ३८ पेक्षा जास्त लोक बेपत्ता आहेत. १००० पेक्षा जास्त ठिकाणी विजेच्या तारा तुटल्या. हजारो ठिकाणी रस्ते बंद करावे लागले. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्याने ७० हजार पर्यटकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवावे लागले. अनेक ठिकाणी एका महिन्यात पडणारा पाऊस एका दिवसात पडला. रस्ते वाहून गेले. शिमल्यासारख्या शहरात भूस्सखलन आणि महापुरात शेकडो लोकांचे प्राण गेले. मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केल्यानुसार हिमाचलमध्ये या वर्षीच्या पावसाळ्यात सुमारे १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त मालमत्तेचे नुकसान झाले.

पंजाबमध्ये परिस्थिती फारशी वेगळी नव्हती. ९ जुलैला झालेल्या पावसात पंजाबच्या अनेक भागांत शेताचे तळे झाले होते. अनेक ठिकाणचे रस्ते खचले. रस्ते खचल्याने वाहतूक व्यवस्था कोलमडली. १० जुलैला शाळा बंद कराव्या लागल्या. दिल्लीतही तशीच परिस्थिती होती. (एका दिवसात सहा इंच पाऊस पडला) असंख्य लोकांना स्थलांतरीत करावे लागले. यमुना नदीच्या पुराने लाल किल्ला आणि सर्वोच्च न्यायालयाचे दार गाठले. काश्मीरमध्येही अतिवृष्टीमुळे महामार्ग बंद करण्यात आले. आजवरच्या इतिहासात प्रथमच हरियाणात पुराची परिस्थिती उद्भवली. राजस्थानमध्येही पूरपरिस्थितीमुळे जवळपास तीन हजार लोकांचे स्थलांतर करण्यात आले. उत्तराखंडमध्ये पुराने ७५ पेक्षा जास्त लोकांचे प्राण गेले. उत्तर प्रदेशातही पुराने प्राणहानी झाली. या वर्षी पहिल्याच तडाख्यात उत्तर भारतात पावसाने, पुराने आणि त्यात झालेल्या हानीने कळस गाठला. शेतातील पिकांची माती झाली आणि शेती पिकवणारी मातीही वाहून गेली. अनेक गाड्या वाहून गेल्या, इमारती कोसळल्या, हजारो झाडांची हानी झाली, पूर्ण झाडे उन्मळून पडली.

एकीकडे उत्तर भारतात पावसाने अशी परिस्थिती निर्माण केली असताना महाराष्ट्र, कर्नाटकातील काही भाग आणि मध्य प्रदेशातील काही भागांत अवर्षणाचे संकट उभे केले. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर सुरुवातीच्या पावसाने आशा पल्लवीत होऊन शेतकऱ्यांनी पेरणी केली. पिके जोमाने उगवली. पिकाने वाढ पकडली असताना पावसाने दडी मारली. अनेक भागांत उगवलेले गवतही जळू लागले आहे. पिकांची वाढ तर पूर्णतः थांबली. एका भागात शेतातील पिके वाहून गेली आहेत, तर दुसरीकडे पावसाच्या प्रतीक्षेत पिके जळाली आहेत. उजनी तलावासह पश्चिम महाराष्ट्रातील तलाव भरले नाहीत. ऑगस्टच्या सुरुवातीला उजनी धरण उपयुक्त पाणीसाठ्याच्या २७ टक्के खाली होते. त्यामुळे उजनी धरणातून पाणीपुरवठा होत असलेल्या शहरांना तीन ते सात दिवसांआड पाणी पुरवले जाऊ लागले आहे. अनेक गावांत टँकरने पाणीपुरवठा सुरू झाला. पुणे जिल्ह्यातील ५८ गावांना ४१ टँकरमार्फत पाणी पुरवण्यात येते. जवळपास एक लाख लोकसंख्या टँकरच्या पाण्यावर तहान भागवत आहे. यावर्षी मे महिन्यात केवळ १० टँकर सुरू होते. जूनमध्ये पाऊस पडला की टँकरची संख्या कमी व्हायची, यावर्षी मात्र ती चौपटीने वाढली. म्हणूनच महाराष्ट्राने पावसाळ्यात दुष्काळ अनुभवला आहे, अनुभवत आहे.

जालना जिल्ह्यात आजवर १०९ विहिरी शासनाने ताब्यात घेतल्या आहेत. तेथे केवळ सरासरीच्या ४५ टक्के पाऊस झाला आहे. पावसाळ्याच्या शेवटच्या सप्टेंबर महिन्यात जालना भागात अशी भीषण परिस्थिती उद्भवली आहे. जिल्ह्यातील ५० प्रकल्प कोरडे पडले आहेत. सर्व मध्यम प्रकल्पातील पाणीसाठा ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. काही प्रकल्पात तर १० टक्के इतकेच पाणी राहिले आहे. नगर जिल्ह्यातही टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. २० टँकरने ४० हजार लोकांना पाणी पुरवण्यात येते. बीड जिल्ह्यात सर्वाधिक भीषण परिस्थिती आहे. जिल्ह्यात एकूण ४७९ टँकरनी पाणीपुरवठा करण्यात येत आहे. जवळपास पाचशे विहिरी जिल्हा प्रशासनाने ताब्यात घेतल्या आहेत. शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले असे वाटत होते. मात्र, आता दुबार पेरणीचे दिवसही गेले आहेत. परतीच्या पावसात रब्बीची पेरणी करण्याचा शेतकऱ्याला विचार करावा लागेल. महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांतील अवस्था कमी-जास्त प्रमाणात अशीच आहे.

मानवाला खाण्यासाठी पुरेसे अन्न आहे, मात्र पिण्यासाठी पाणी नाही असे भीषण चित्र उभे राहिले आहे. मानवाच्या अन्न, पाणी आणि हवा या तीन मूलभूत गरजा. या तिन्ही गोष्टींचा पुरवठा निसर्ग करतो. या तिन्ही गोष्टींची काळजी आपण घ्यायला हवी. मात्र, आपण अन्नाकडे पुरेसे लक्ष दिले. हरित क्रांती घडवली. त्यामुळे दोन वर्ष शेतातील उत्पादन झाले नाही तरी पुरेल इतका अन्नधान्याचा साठा असल्याचे सांगण्यात येते. मात्र, केवळ अन्नधान्य नाही तर फळभाज्या आणि पालेभाज्याही लागतात. त्या पिकवण्यासाठी पाण्याची गरज लागते हे विसरले जाते. त्याचबरोबर पाण्याची पिण्यासाठी सर्वाधिक गरज आहे, हेही विसरता येणार नाही. २०१४ च्या दुष्काळात सांगलीहून रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागला होता. भविष्यात असे चित्र वारंवार पहावे लागेल.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००